अधीक्षक, जिल्हा कारागृह वर्ग-२/उप अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह या संवर्गातून अधीक्षक जिल्हा कारागृह, वर्ग-१/अतिरिक्त अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह या संवर्गात तदर्थ पदोन्नती देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन आदेश क्र. जेएलई-०४१७/२०४५(१६)/प्र.क्र-९९/तुरुंग-१

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : २९ जून, २०१९.

<u>संदर्भ</u> :-
1) शासन अधिसुचना,सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/ कार्या.१२, दि.२८.०४.२०१५ व दि. १५.०६.२०१७
२) सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक बी.सी.सी. २०१७/प्र.क्र.३१२-A-/ १६-ब, दि. २९.१२.२०१७
३) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक २२.१२.२०१६ व दि. २९.०५.२०१९ रोजीचे पत्र

शासन आदेश :-

कारागृह विभागातील अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या दिनांक २२.१२.२०१६ रोजीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने गृह विभाग शासन निर्णय दिनांक २१.०५.२०१३ अन्वये गठित करण्यात आलेल्या विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक २६.१०.२०१८ रोजी मा. अपर मुख्य सचिव (अपिल व सुरक्षा) यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर बैठकीच्या शिफारसींस प्राप्त झालेल्या शासन मान्यतेच्या अधिन राहून अधिक्षक, जिल्हा कारागृह, वर्ग-२ / उप अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह या संवर्गातील खालील तक्त्यात नमुद केलेल्या अधिका-यांना अधीक्षक, जिल्हा कारागृह, वर्ग-१/अतिरिक्त अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह (राजपत्रित गट-अ) (वेतनश्रेणी रू. १५६००-३९१०० + ग्रेड पे -६६००/-) या संवर्गात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

अनु. क्र.	अधिका-यांचे नाव	जाती प्रवर्ग	वाटप केलेला महसुल विभाग	पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण
१	श्रीम. गिता हनुमंत शिकारे	खुला	औरंगाबाद	पैठण, खुले कारागृह, पैठण
२	श्री. वैभव सुधाकर आगे	इ.मा.व.	नागपूर	चंद्रपूर जिल्हा कारागृह, चंद्रपूर
३	श्री. किर्ती चिंतामणी (डहाळे)	खुला(इ.मा.व)	अमरावती	यवतमाळ जिल्हा कारागृह, यवतमाळ

४	श्री. अनुपकुमार कुमरे	अ. ज.	नागपूर	नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर
५	श्रीम. अरुणा मुगुटराव	भ.ज.(क)	औरंगाबाद	जालना जिल्हा कारागृह, जालना
६	श्री. राजकुमार साळी	वि.मा.प्र.	नागपूर	भंडारा जिल्हा कारागृह, भंडारा
७	श्री. सदानंद गायकवाड	वि. जा. (अ)	कोकण-२	भायखळा जिल्हा कारागृह, भायखळा
८	श्री. अंकुश सदाफुले	अ. जा.	अमरावती	अकोला जिल्हा कारागृह, अकोला
९	श्री. सुहास पवार	अ. जा.	नागपूर	वर्धा जिल्हा कारागृह, वर्धा
१०	श्री. सुनिल ढमाळ	खुला	पुणे	अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे (मुख्यालय)

२. उपरोक्त अधिका-यांस -महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटपाबाबत संदर्भ क्र.१ येथे नमुद करण्यात आलेल्या अधिसूचना विचारात घेऊन, उपरोक्त स्तंभ ३ मध्ये दर्शविल्यानुसार महसुल विभागवाटप करण्यात आले आहे. त्यानुसार त्यांची दिनांक २४.०५.२०१९ रोजी घेण्यात आलेल्या नागरी सेवा मंडळाच्या बैठकीच्या शिफारशीस मिळालेली शासन मान्यता विचारात घेऊन, त्यांची स्तंभ ४ येथे दर्शविल्याप्रमाणे पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे.

३. सदर तदर्थ पदोन्नती खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

(अ) पदोन्नतीसाठी पात्र ठरलेल्या उपरोक्त अधिकाऱ्यास देण्यात येणारी अधीक्षक, जिल्हा कारागृह, वर्ग-१ / अतिरिक्त अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह (राजपत्रित गट-अ) (वेतनश्रेणी रू. १५६००-३९१०० + ग्रेड पे -६६००/-) या संवर्गातील पदोन्नती तदर्थ स्वरुपाची आहे.

(ब) सदर तदर्थ पदोन्नतीसाठी अधीक्षक, जिल्हा कारागृह वर्ग-२ / उप अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह या संवर्गाची न्यायालयीन प्रकरणांच्या अधिन राहून निर्गमित केलेल्या अंतीम ज्येष्ठतासूची विचारात घेण्यात आल्या असल्याने, सदर पदोन्नती अंतिम ज्येष्ठतासूचीमधील न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने होणा-या बदलाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(क) सदर अधिकारी यांनी एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण केली नसेल किंवा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविली नसेल तर पदोन्नतीनंतर सदर परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविणे आवश्यक राहील.

(ड) सदर पदोन्नतीने पदस्थापणेच्या पदावर संबंधीत अधिका-याने १५ दिवसांत रूजू व्हावे अन्यथा सदर पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील.

४. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक २७९७/२०१७ (स्टॅम्प क्रमांक ७२५६/२०१५) महाराष्ट्र राज्य विरुध्द श्री. विजय घोगरे व इतर तसेच संलग्न न्यायालयीन प्रकरणात दिनांक ०४.०८.२०१७ रोजी अंतीम निर्णय दिलेला असून त्या अनूषंगाने मा. सर्वेच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मधील अंतिम निर्णयास अधीन राहून, सदर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची पदोन्नती देण्यात येत आहे.

५. अधीक्षक, जिल्हा कारागृह वर्ग-२/उप अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह या संवर्गातून अधीक्षक, जिल्हा कारागृह वर्ग-१/ अतिरिक्त अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह (राजपत्रि गट-अ) या संवर्गात पदोन्नत झालेल्या उपरोक्त अधिका-यांनी पदोन्नतीच्या पदावर संबंधीत ठिकाणी रुजू होऊन कार्यभार स्वीकारल्यानंतरच अधीक्षक, जिल्हा कारागृह वर्ग-१/ अतिरिक्त अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह या संवर्गाच्या वेतनाचे लाभ अनुज्ञेय होतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०६२९१७४२१३५४२९ असा आहे. सदर शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Narayan Shrikrishna Karad

Digitally signed by Narayan Shrikrishna Karad
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9a5ba422569807a70f83ba75f7e5057f99ed671bf7ac8f8fb14e28b9d6f90514, cn=Narayan Shrikrishna Karad
Date: 2019.06.29 17:47:25 +05'30'

(ना. श्री. कराड)
उप सचिव, गृह विभाग

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२) मा.राज्यमंत्री (ग्रामीण /शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४) अपर मुख्य सचिव (सेवा) यांचे स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

५) अपर मुख्य सचिव (अपिल व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

६) पोलीस महासंचालक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

८) सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ४०० ०२१.

९) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २ मुंबई / नागपूर.

१०) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर.

११) कारागृह उप महानिरीक्षक, मुख्यालय, पुणे/ मध्य विभाग औरंगाबाद/ पूर्व विभाग, नागपूर/ पश्चिम विभाग, पुणे/ दक्षिण विभाग, मुंबई.

१२) जिल्हा कोषागार अधिकारी,नागपूर, कोल्हापूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, सिंधुदुर्ग, अमरावती, रत्नागिरी, जालना, भंडारा, वर्धा, वाशिम

१३) संबंधित अधिकारी , (मार्फत :- अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१)

१४) सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन -१२), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

१५) निवडनस्ती - तुरुंग-१.